संच : क

# ७ वी मराठी

महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र

शैक्षणिक प्रगती चाचणी

पायाभूत चाचणी २०१७-१८ : इयत्ता - सातवी

विषय : मराठी (लेखी)

विद्यार्थ्याचे नाव : ______________________________

शाळेचे नाव : ______________________ दिनांक : / /२०१७

केंद्र : __________ ता. __________ जि. __________ प्राप्त गुण : [ ]

हजेरी क्रमांक : [ ] तुकडी : ______ शिक्षकाची स्वाक्षरी ______ एकूण गुण : ५०

---

**प्रश्न १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ______________ २) ______________

३) ______________ ४) ______________

५) ______________ ६) ______________

७) ______________ ८) ______________

९) ______________ १०) ______________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 7th \Proof-II\19-06-17\G

## संच : क

**प्रश्न २ ते ४ साठी :** हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

मुंबईत मेट्रो ट्रेन सुरू झाली आणि त्यातून प्रवास करण्यासाठी खूप झुंबड उडाली. मेट्रो खरोखरच अजब आहे. प्लॅटफॉर्म चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी सरकते जिने, टोकन टाकताच उघडणाऱ्या झडपा, मेट्रोच्या डब्यांचे आपोआप उघडणारे-बंद होणारे दरवाजे, वातानुकूलित स्वच्छ डबे, झूम वेगात धावणारी ही गाडी. पावसाळ्यात उड्डाण पुलावरून मेट्रोतून प्रवास करताना ढगांतून तरंगत जात असल्याचा अनुभव येतो. बोगद्यातून जाताना जगाशी संबंध तुटल्यासारखा भासतो. या आधुनिक मेट्रोतून प्रवास करून आल्यावर काही प्रश्न मनात आले.

रूपाली चव्हाण यांच्याशी साधलेला हा संवाद. त्या मेट्रो चालवणाऱ्या पहिल्या महिला सारथी ठरल्या आहेत.

प्रश्न : मेट्रो पायलट होण्यासाठी तुम्ही काय काय प्रयत्न केले. कोणता अभ्यास केला?

रूपाली : मी कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुलगी. सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून इंजिनियर झाले. मेट्रोमध्ये पायलट होण्यासाठी इंजिनियर व्हावे लागते. एवढेच नाही तर चाचणी परीक्षाही पास व्हावे लागते. ही चाचणी खूप अवघड असते.

प्रश्न : फक्त परीक्षा पास झालात की तुम्हाला पायलट म्हणून मान्यता मिळते का?

रूपाली : नाही, नाही. यानंतर उमेदवाराची मानसिक आणि शारीरिक चाचणी घेतली जाते. या सर्व चाचण्यांत पास झालात, की मग मुलाखत घेतली जाते. मुलाखतीमध्ये निवड झाल्यावर मग मेट्रो चालवण्याचे एक वर्षाचे प्रशिक्षण दिले जाते आणि मगच तुम्ही मेट्रो पायलट बनू शकता.

**प्रश्न २.** मेट्रो चालविणाऱ्या पहिल्या महिला सारथी कोण? ते लिही. (गुण १)

---

**प्रश्न ३.** पावसाळ्यात उड्डाण पुलावरून मेट्रोतून प्रवास करताना कोणता अनुभव येतो. योग्य पर्यायाला गोल कर. (गुण २)

अ) जगाशी संबंध तुटल्यासारखा

ब) झूम वेगाने गेल्यासारखा

क) ढगांतून तरंगत जात असल्याचा.

**प्रश्न ४.** मेट्रो खरोखरच अजब का आहे त्याची उताऱ्यातील दोन वैशिष्ट्ये लिही. (गुण २)

---

---

**संच : क**

**प्रश्न ५ ते ७ साठी :** खाली दिलेली कविता वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

**आतां उजाडेल!**

खिन्न आंधळा अंधार, आतां ओसरेल पार
लहरींत किरणांची कलाबूत मोहरेल.... आतां उजाडेल!
शुभ्र आनंदाच्या लाटा गात फुटतील आतां
मृदु गळ्यांत खगांच्या किलबिल पालवेल.... आतां उजाडेल!
वारा हसेल पर्णात मुग्ध हिरवेपणांत
गहिंवरल्या प्रकाशीं दहिंवर मिसळेल.... आतां उजाडेल!
आनंदांत पारिजात उधळील बरसात
गोड कोंवळा गारवा सुगंधांत थरारेल.... आतां उजाडेल!

(मंगेश पाडगांवकर)

**प्रश्न ५.** कवितेतील अर्थावरून कवीला कोणत्या वेळेचे वर्णन करायचे आहे. योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) सूर्य मावळण्याची

ब) सूर्य मध्यावर असण्याची

क) सूर्य उगवण्याची

**प्रश्न ६.** कोणाच्या मृदू गळ्यात किलबिल पालवणार आहे ते समानार्थी शब्द वापरून लिही. (गुण २)

________________________________________

________________________________________

**प्रश्न ७.** पुढील कवितेच्या ओळीचा अर्थ तुझ्या शब्दात लिही. (गुण २)

आनंदात पारिजात, उधळील बरसात

________________________________________

________________________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 7th \Proof-II\19-06-17\G

## संच : क

**प्रश्न ८ ते १० साठी :** हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

पीयुष नाखुशीनेच आईबाबांबरोबर नाशिकला आला. शाळा सुरू झाली. पीयुषला आजी, आजोबा, चितांबरीची आठवण होत होती. एक दिवस सकाळी पीयुष शाळेचा होमवर्क करत होता, तेवढ्यात त्याला गाईच्या हंबरण्याचा आवाज आला. पीयुषला वाटले, चितांबरीच आली. तो धावत अंगणात आला, तर काळ्या रंगाची एक व पिवळ्या रंगाची एक अशा दोन गाई त्याला अंगणापलीकडे झाडाखाली उभ्या दिसल्या. पीयुषने पटकन आईकडून गरमगरम दोन पोळ्या आणल्या आणि त्या गाईंना खाऊ घातल्या. आई पीयुषच्या मागे धावत आली. ''अरे मारेल गाय जरा जपून.'' पण पीयुष कसला ऐकतोय.

दुसऱ्या दिवशीही सकाळी त्याच वेळी पीयुषला गाईचे हंबरणे ऐकू आले. तो धावत बाहेर आला, तर काळ्या रंगाची एकच गाय त्याला झाडाखाली उभी दिसली. पीयुषने तिला गरम पोळी खाऊ घातली. तिच्या तपकिरी गोल मोठ्या डोळ्यांकडे तो बघत बसला. रोजच ती गाय सकाळी येऊ लागली. पीयुष तिला पोळी देई, तिच्याशी बोलत बसे. त्याने आईशी बोलून गाईचे नाव 'शामली' ठेवले. आई आग्रहाने त्याला तेथून उठवून शाळेची तयारी करून देई. शामलीला टाटा करत पीयुष शाळेला जाई. संध्याकाळी शाळेतून आल्यावर अंगणात शामली नसे. शामली रोजच सकाळी पीयुषच्या अंगणात येई. शाळेचा होमवर्क आणि शामलीशी गप्पा असा पीयुषचा सकाळचा वेळ जाई. अशा प्रकारे शामलीची आणि त्याची अगदी गट्टी झाली.

**प्रश्न ८.** 'चितांबरी' हे नाव कोणाचे असावे असे तुला वाटते. योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) पीयुषच्या बहिणीचे ब) पीयुषच्या मैत्रिणीचे क) पीयुषच्या गाईचे

**प्रश्न ९.** 'अरे मारेल गाय जरा जपून' असे पीयुषची आई का म्हणाली असेल असे तुला वाटते ते लिही. (गुण २)

**प्रश्न १०.** शामली कशी दिसत असे ते लिही. (गुण २)



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 7th \Proof-II\19-06-17\G

## संच : क

**प्रश्न ११ ते १३ साठी :** हा लेख वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

**किशोर एप्रिल, १५ :** आता एक सर्वात महत्त्वाची गोष्ट. मित्रहो, पैसा हे फक्त एक साधन असते. माध्यम असते. तुम्ही म्हणता, मला पैसा हवा, पण हे ध्यानात ठेवा, पैसा आला, की तो तुम्हांला हाच प्रश्न करतो, 'मी आलोय आता बोला तुम्हांला काय हवंय?' पैशाने तुम्ही जे हवे ते विकत घेऊ शकता, पण तुम्हांला नेमके काय हवे? हे काही पैसा ठरवत नसतो, ते तुम्हीच ठरवायचे असते. तुम्हांला समजा बक्षीस म्हणून हजार रुपये मिळाले, तर ते तुम्ही मौजमस्तीत उधळू शकता किंवा त्याची छान पुस्तके विकत घेऊ शकता. तेव्हा तुम्हांला आयुष्यात काय हवे आहे? हे तुम्हीच ठरवायचे आहे. ते जितके लवकर ठरवाल, तेवढे उत्तम! आणि होय, हेही लक्षात ठेवा, पैशाने तुम्ही हवे ते मिळवू शकता, पण जगात पैसा फेकला, की सगळे मिळते, हे मात्र खरे नव्हे. मौज अशी आहे, की आयुष्यात जे खूप मोलाचे असते, तेच नेमके पैशांनी विकत घेता येत नसते.

पैशांनी महागडा बेड विकत घेता येतो, पण झोप नाही विकत घेता येत. पैशांनी तुम्हांला सोबत मिळवता येते, मैत्री नाही विकत मिळत. पैसे फेकून प्रसिद्धी, प्रतिष्ठा मिळू शकते, प्रेम नाही मिळत! तेव्हा पैसा जरूर मिळवा, पण पैशांनी सगळे मिळते या भ्रमात मात्र राहू नका.

**प्रश्न ११.** पैसा काय ठरवू शकत नाही? (गुण १)

______________________________

**प्रश्न १२.** ''पैसा हे फक्त एक साधन-माध्यम आहे'' असे लेखकाने का म्हटले असावे. योग्य पर्यायाला गोल कर. (गुण २)

अ) पैशाने फक्त देवाण-घेवाण करता येते म्हणून.

ब) पैशाने सर्वच घेता येते म्हणून

क) पैशाने मौज करता येते म्हणून

**प्रश्न १३.** पैशाने काय-काय विकत घेऊ शकत नाही? ते वरील लेखातून लिही. (गुण २)

______________________________

______________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 7th \Proof-II\19-06-17\G

## संच : क

**प्रश्न १४.** खालील वाक्यातील अधोरेखित नामांचे प्रकार लिही. (गुण २)

<u>पर्वत</u> तो <u>चपळाईने</u> चढला.

________________________________________

________________________________________

**प्रश्न १५.** पुढील प्रसंग वाच व त्याला अनुरूप म्हण ओळख. योग्य पर्यायाला गोल कर.

शामला बोलकी तर नम्रता अबोल, विनित प्रेमळ तर शिवराज रागीट म्हणूनच तर म्हणतात ना ____________ (गुण १)

अ) लाथ मारील तिथे पाणी काढील.

ब) हातच्या कंकणाला आरसा कशाला?

क) हाताची पाचही बोटे सारखी नसतात.

**प्रश्न १६.** रिकाम्या जागी कंसातील क्रियापदाचे योग्य रूप लिही. (गुण १)

अ) पाहुण्यांसाठी आईने आधीच सरबत __________ ठेवले. (करणे)

ब) जॉन मित्रांना पाहताच __________ सुटला. (पळणे)

**प्रश्न १७.** खालील मजकुरात योग्य सर्वनामांचा वापर कर. (गुण २)

सरांनी आशुतोषला, '' ________ वह्या घेऊन जा'' असे सांगितले.

''__________ वह्या आणल्या नाहीत? ते विचार असे म्हणाले.

__________ मुलांना निरोप दिला. ________ अभ्यासाला बसला.

**प्रश्न १८.** 'जाडेभरडे' आणि 'बर्फाच्छादित' या विशेषणांचा वापर करून प्रत्येकी एक वाक्य लिही. (गुण २)

________________________________________

________________________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 7th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**प्रश्न १९.** पुढील वाक्यातील कर्ता व कर्म ओळख.

शबानाने चित्र रंगविले. (गुण १)

कर्ता : ______________________

कर्म : ______________________

**प्रश्न २०.** खालील वाक्यातील विशेषण व विशेष्य ओळख. (गुण १)

मंगेशने दुप्पट गुंतवणूक केली.

विशेषण : ______________________

विशेष्य : ______________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 7th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**प्रश्न २१.** खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे संवाद तयार करून लिही. (गुण ५)

नेहा शाळेतून येताच, तिने आजोबांना बँकेत चोरी झाल्याचे सांगितले. कारण, घराकडे येण्याच्या रस्त्यावरच बँक होती. तिथे तिला हा प्रसंग समजला. तर आजोबा व नेहामध्ये काय संवाद झाला असेल ते लिही.



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 7th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**प्रश्न २२.** खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर कल्पना करून तू तुझ्या भाषेत लिही. (गुण ५)

१) मोबाईलवर बंदी आली तर... २) शाळेला दप्तरच नसेल तर...

३) सूर्य उगवला नाही तर... ४) सायकल बोलू लागली तर...



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 7th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**प्रश्न २३.** मित्राला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्याकरिता पत्र लिही. (गुण ५)

■■■